सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक-संकीर्ण -०७२४/६०८/प्र.क्र.३९०/ पोल-५ ब, दि.०५/०८/२०२५.

**विषय** :- समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३,गडचिरोली, यांच्या आस्थापनेवर सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत.
श्री.निलेश पांडुरंग मुसळे, सशस्त्र पोलीस शिपाई.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक-संकीर्ण-०७२४/६०८/प्र.क्र.३९०/ पोल-५ ब, दि.०५/०८/२०२५, ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८०५१२०६१६९५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३,गडचिरोली.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (आस्थापना-२).

प्रत्,
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, आस्थापना,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, आस्थापना,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३,गडचिरोली,यांच्या आस्थापनेवर सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत...**
**श्री. निलेश पांडुरंग मुसळे, सशस्त्र पोलीस शिपाई**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण ०७२४/६०८/प्र.क्र.३९०/पोल-५ब,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक – ०५ ऑगस्ट, २०२५.

**वाचा** :- १) पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (आस्था २),पोलीस महासंचालक कार्यालय यांचा दिनांक २३.०९.२०२४ रोजीचा प्रस्ताव.
२) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २०(४).
३) वैद्यकीय प्राधिकारी, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर, यांचे दिनांक ०४.०९.२०२३ रोजीचे प्रमाणपत्र.
४) वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि. २९.०१.२०२५ रोजीच्या बैठकीचे दि.०७.०२.२०२५ रोजीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :**

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, गडचिरोली यांच्या आस्थापनेवरील श्री.निलेश पांडुरंग मुसळे, सशस्त्र पोलीस शिपाई हे दिनांक २९.०७.२०१४ पासून शासन सेवेत रुजू झाले आहेत. श्री.मुसळे यांना शासन सेवेत कार्यरत असताना दि.०९.०६.२०२२ रोजी अपघात झाल्याने ८० टक्के अपंगत्व आले आहे. वैद्यकीय प्राधिकारी, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांनी दि.०४.०९.२०२३ अन्वये श्री.मुसळे यांना कायमस्वरुपी अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिले आहे. श्री.मुसळे हे नियतवयोमानानुसार दि.**३०.११.२०४४** रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. श्री. मुसळे यांना कायमचे अंपगत्व आल्यामुळे, त्यांच्यासाठी अधिसंख्य पद निर्माण करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २० (४) मधील तरतूदीनुसार, श्री.निलेश पांडुरंग मुसळे, सशस्त्र पोलीस शिपाई, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, गडचिरोली यांच्यासाठी योग्य पद उपलब्ध होत नाही तोपर्यंत किंवा त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत अथवा अन्य कारणांमुळे पद रिक्त होईल यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी दि.०४.०९.२०२३ पासून सशस्त्र पोलीस शिपाई या संवर्गाचे एक अधिसंख्य पद गृह विभागांतर्गत निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने दि.**१३.०५.२०२५** रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे.

प्रस्तुत मान्यतेनुसार, श्री.निलेश पांडुरंग मुसळे, सशस्त्र पोलीस शिपाई, यांचे एस-**७** (**२१७०० - ६९१००**) अधिक विशेष वेतन रु ७५०/- या वेतनश्रेणीतील वेतन काढण्यासाठी समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, गडचिरोली यांचे अधिनस्त सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गातील एक अधिसंख्य पद दिनांक ०४.०९.२०२३ पासून निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पद समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, गडचिरोली यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहे.

३. सदर अधिसंख्य पद हे श्री. मसुळे यांच्यासाठी योग्य पद उपलब्ध होत नाही तोपर्यंत किंवा त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत अथवा अन्य कारणांमुळे पद रिक्त होईल यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात येत आहे. त्यानंतर सदर पद आपोआप संपुष्टात येईल.

४. सदर पदाच्या वेतन व भत्त्यावरील खर्च हा " मागणी क्रमांक-बी-१, मुख्यलेखाशीर्ष २०५५-पोलीस उपलेखाशिर्ष-१०८, राज्य मुख्यालय पोलीस(०२) शहर पोलीस(०२)(०१)शहर पोलीस आस्थापना २०५५००९७-०१(वेतन) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक १३.०५.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०१८९/आपुक, दिनांक २४.०७.२०२५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२५०८०५१२०६१६९५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Digitally signed by RAVINDRA NAMDEV PATIL
Date: 2025.08.05 12:07:10 +05'30'

**(रविंद्र ना पाटिल)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति**,
१.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२.महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य मुंबई/ नागपूर.
३.महालेखापाल ( लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर.
४. समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, गडचिरोली.
५.जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
६.वित्त विभाग, आ.पु.क. कक्ष मंत्रालय,मुंबई.
७.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८.निवडनस्ती, पोल ५-ब, गृह विभाग, मंत्रालय मुंबई-३२.